साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राहुल अरूण चौधरी
वय २८ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.अंतरगाव ता.समुद्रपुर, जि.वधा्र.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.काठोके यांच्या मार्फत**

१. सदर अपघाताबाबत मला माहिती आहे. सदर अपघात हा मी घटनास्थळावर येण्यापुर्वी् झाला होता. घटनेची तारीख मला आठवत नाही. घटनास्थळ हे सालेभटीच्या जवळील आहे. या व्यतिरीक्त मला काही माहिती नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी सागर झिगझाग लाजिस्टीक कंपनीमध्ये कुरीयर बॉय म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर कंपनीच्या गाडीने कुरीयर वाटप करीत असतो. गाडीचा नंबर मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दि. २४/०९/२२ रोजी सायंकाळी ५.१५ वाजेच्या सुमारास गावातील संजय सातपुते याने त्याचे वडील दिवाकर याच्या मोबाईलवरून मला फोन करून सांगितले की सागर खडसे हयाचा अपघात खातखेडा गावाजवळ झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी घटनास्थळावर गेलो असता माझा मित्र सागर खडसे हा रोडच्या उजव्या बाजुला गंभीर जखमी अवस्थेत पडलेला दिसुन आला व त्याचे डोक्याजवळ रक्त सांडलेले होते व आजुबाजुला गाडीचे स्पेअरपार्टर्स पडलेले दिसले व रोडवर मोटर सायकल ही चढावावर तुटलेल्या अवस्थेत होती. हे म्हणणे खरे आहे की मला घटनास्थाळावरील हजर असलेल्या लोकांनी सांगितले की शिर्सीकडुन उमरेड कडे जाणारी बोलेरो चार चाकी वाहन एम.एच.४०–के आर–८१२१ या वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणारी माझे मित्राची हिरोहोंडा मोटरसायकल क्रं. एमएच–३२एएल–०९८१ हिला समोरून धडक मारल्याने माझे मित्र सागर याच्या डोक्याला गंभीर दुखापत होवुन तो जागीच मयत झाला. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे व तो खरा व बरोबर आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखतो आरोपी न्यायालयात हजर नाही.

आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्रं. १९ वर दाखल, मंजुर ओळखी बाबत तक्रार नाही.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. पी.एच.रघुते उलटतपास :</u>**

२. माझे मोबाईलवर घटनेबाबत माहीतीचा फोन आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की अपघाताची माहिती दिवाकर खडसे यांनी सांगितली. ज्या गाडीने अपघात केला होता त्या गाडीचा नंबर मला सांगता येणार नाही. ज्या गाडीने मी घटनास्थ्ळावर गेलो होतो त्या गाडीचा नंबर ६१८९ असा होता. सागर हा कुरीयचे काम करीत होता. सागर हा कुरीयरचे काम करीत असल्याने त्याचे पाठीमागे मोठी बॅग राहायची व त्यामध्ये कुरीयरचे सामान राहायचे. हे म्हणणे खरे आहे की मी प्रत्यक्ष अपघात पाहिलेला नाही त्यामुळे सदर अपघात कोणाच्या चुकीने झाला हे मला माहित नाही. शिर्सी ते उमरेड रोड हा अत्यंत वर्दीळचा असल्याने गाडयाची नेहमी येजा असते. आरोपीबद्दल दुस–याने मला सांगितले त्यामुळे आरोपी मला माहित आहे. मी प्रत्यक्ष आरोपीला पाहिले नाही.

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२२.०९.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड